जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९२ दिनांक - २४/११/२०२४**

गुन्हे शाखा, युनिट-०४, पुणे शहर

## रात्रीची घरफोडी करणा-या आरोपी कडुन दोन गुन्हे उघडकीस

दि.२३/११/२०२२ रोजी युनिट-४ कडील स्टाफ खडकी पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना सहा.पोलीस फौजदार प्रविण राजपुत व पोलीस अंमलदार सुभाष आव्हाड यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, आठ दिवसा पुर्वी धानोरी येथे घरफोडी करणारा मंजु पाटील हा मुळा रोड येथे एका दुचाकीवर बसुन कोणाची तरी वाट पहात आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाली.सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, यांना कळविली असता त्यांनी बातमीचे ठिकाणी जावुन खात्री करुन मिळुन आल्यास कारवाई करण्याचे आदेश दिले.

लागलीच युनिट-४ कडील पथक तात्काळ बातमीचे ठिकाणी जावुन खात्री केली असता बातमीतील वर्णनाचा इसम एका हॉटेल समोर एका दुचाकीवर बसलेला दिसला.त्यास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **मल्लिकार्जुन ऊर्फ मंजु साहेबराव पाटील वय १९ वर्षे, रा. गंगोत्री अपार्टमेंट, गल्ली नं. २६, सुखसागरनगर, कात्रज पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करता त्याने त्याचा मित्राच्या सोबतीने त्याचे ताब्यात मिळालेल्या दुचाकी मोटार सायकलवरुन सदरची घरफोडी केल्याचे सांगितले.त्याची अंगझती घेतली असता त्याचे खिशामध्ये**. ५०,०००/-रू. व त्याचे ताब्यातील दुचाकी मोटार सायकल किं. रु. १,००,०००/- असा एकुण रु. १,५०,०००/- मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.**

सदर बाबत विश्रांतवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३८२/२०२४ भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ)अन्वये गुन्हा दाखल असुन पुढील तपास विश्रांतवाडी पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची उल्लेख नियकामगिरी, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. राजेंद्र मुळीक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, युनिट-४ यांचे मार्गदर्शनात युनिट ४ कडील पोलीस उप-निरीक्षक, वैभव मगदुम,दिगंबर चव्हाण, सहा.पो.फौ. प्रविण राजपुत, यस्मीन सय्यद, पोलीस अंमलदार हरिष मोरे, अजय गायकवाड, प्रविण भालचीम, विठ्ठल वाव्हळ, संजय आढारी, विशाल गाडे, विनोद महाजन, एकनाथ जोशी, . नागेशसिंग कुंवर,जहांगिर पठाण, मनोज सांगळे, वैभव रणपिसे, देविदास वाढंरे, राहुल परदेशी, सुभाष आव्हाड, भरतगुंडवाड, विशाल ईथापे, महिला पोलीस अंमलदार रोहिणी पांढरकर, मयुरी नलावडे, चालक सहा.पो. फौ.शितल शिंदे यांनी केली आहे.


गुन्हे शाखा
पुणे शहर
युनिट क्र.४
इ - ५, रेंजहिल्स, खडकी,
पुणे - २०
फोन नं. २६२०८४६५
महाराष्ट्र पोलीस
Crime Branch
Pune City
UNIT NO. 4
E-5, Rangehills Road, Khadki,
Pune - 20
PH NO. 26208465